# कापुरबावडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२ – २५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९४३ /२०२५ दि. २२ /०७/२०२५

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** कापुरबावडी वाहतुक उपविभागने हद्दीत आर.पी.एस. पी.आर.एस.ज्यॉइंट वंचर प्रा.लि.कंपनी तर्फे दादलानी चौक बाळकुम या ठिकाणी फुट ओवर ब्रिजसाठी उभारलेल्या पिलरवर ३५० टनी ०२ मोबाईल क्रेनच्या सहाय्याने स्टिल गर्डर टाकण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यावेळी भिवंडीकडून ठाण्याकडे जाणारी सर्व प्रकारची वाहतुक पुर्णपणे बंद ठेवावी लागणार आहे. त्यावेळी भिवंडीकडून ठाण्याच्या दिशेने जाणारी सर्व प्रकारची वाहतुक ही पर्यायी मार्गाने वळवावी लागणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** **१)** भिवंडी कडून कशेळी टोल नाका मार्गे ठाण्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **मढवी चौक, भिवंडी** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही मढवी चौक, भिवंडी येथुन डावे बाजूस वळण घेवुन मानकोली नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) पुर्णा, कोपर, दिवे अंजूर, काल्हेर, कशेळी व इतर गांव येथुन येवुन, कशेळी टोल नाका मार्गे ठाण्याकडे जाणारे सर्व प्रकारची वाहनांना **कशेळी टोल नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरचे मार्गावरून जाणारे सर्व प्रकारची वाहने ही कशेळी टोल नाका येथुन यू टर्न घेवुन, मढवी चौक भिवंडी येथुन उजवीकडे वळणे घेवुन मानकोली नाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

**सदर अधिसूचना हि दिनांक २३/०७/२०२५ रोजी रात्री २३:५५ वा. पासुन ते दिनांक २४/०७/२०२५ रोजी सकाळी ०६:०० वा. पावेतो अंमलात राहील.**

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.

CamScanner

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–५ वागळे इस्टेट, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक
**प्रत** :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,**
संबंधित स.पो.आ. वाहतूक विभाग, पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner